# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** जुल्का **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0383 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/11/2020 20:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 08/11/2020
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/11/2020
   **Time From (वेळेपासून):** 10:02 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 10:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/11/2020 **Time (वेळ):** 19:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/11/2020 19:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 12 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शुभम हॉटेल,राजाकीन्ही ,मालेगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ब्रम्हदेव उत्तमराव डाखोरे
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** उत्तमराव
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by TapScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पिंपळशेंडा,मालेगांव,जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पिंपळशेंडा,मालेगांव,जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9765319923

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोहेकाँ.गणेश गणपत नरवाडे ब नं 583 | | | 1. नारतास रोड ,हॅप्पी फेसेस जवळ महसुल काँलनी,मालेगांव ,मालेगांव ,जुल्का, वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पोकाँ संतोष जगदेव गि-हे ब.नं 544 | | | 1. खोडके यांचे घरी किरायाने,महसुल काँलनी साई मंदीर समोर,मालेगांव , मालेगांव,जुल्का,वाशिम,महाराष्ट्र,भारत<br>2. चोंढी,पातुर,पातुर,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 3 | शुभम रमेश तिवारी | | | 1. किन्हीराजा,मालेगांव,जुल्का,वाशिम, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दोन हजार एक नोट व पाचशे चे चार नोट | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:-08.11.2020 माझे नांव- ब्रम्हदेव उत्तमराव डाखोरे, वय-32 वर्श, व्यवसाय वकिल, शेषन कोर्ट अकोला, रा.पिंपळशेंडा, ता.मालेगाव, जि.वाशिम मो.नं. 9765319923 मी वरील ठिकाणी राहतो व शेषन कोर्ट अकोला येथे वकिली करतो. दिनांक 07.11.2020 रोजी पो.नि.श्री.इंगोले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचेकडे किन्हीराजा शिवार येथे पंच क्र. 1) शेख वसीम शेख नसीर, आरोग्य पट्टीबंधक, 2) हरी गुरूचरण तांबोळी, कक्षसेवक, दोन्ही जिल्हा सामान्य रूग्णालय वाशीम,यांचे समक्ष लाच मागणी बाबत तक्रार नोंदविली की, दिनांक 25.10.2020 रोजी माझी आई नामे सौ.सुवर्णमाला डाखोरे, वय-55 वर्श, व माझा चुलत भाउ नामे शिवाजी डाखोरे याची पत्नी नामे सौ.सुनिता वय-27 वर्ष, यांच्या मध्ये घरगुती किरकोळ कारणा वरून वाद झाला होता. त्यावरून माझ्या आईने शिवाजी डाखोरे, त्याची पत्नी सुनिता, सुनिता चे वडिल सदाशिव भोंडने, सुनिता चा जावाई आनंदा भोकरे तसेच गावातील शेजारी काशिराम डाखोरे यांचे विरूध्द पोलीस स्टेशन जउळका येथे तक्रार दिली होती. तसेच शिवाजी डाखोरे यांनी माझी आई, वडिल, भाउ व माझे विरूध्द पो.स्टे.जउळका येथे तक्रार दिली होती. त्यावरून पो.स्टे.जउळका अंतर्गत किन्हीराजा पोलीस चौकीचे पोलीस कॉन्स्टेबल संतोष गि-हे यांनी आम्हा दोन्ही पार्टीला किन्हीराजा पोलीस चौकी येथे बोलाविले होते. त्यावरून आज दि.07.11.2020 रोजी आम्ही किन्हीराजा पोलीस चौकी येथे जावून संतोष गि-हे साहेब यांना भेटलो व आम्ही आमचा वाद मिटविल्या बाबत सांगितले. त्यावेळी संतोष गि-हे साहेबाने सदर प्रकरणात पुढे कोणतीही कारवाई न करण्यासाठी मला 2000/-रूपये ची मागणी केली. पो.काँ. गि-हे साहेब यांनी आमच्यामध्ये झालेल्या भांडणाचे प्रकरणात पुढे कार्यवाही न करण्यासाठी 2000/-रूपये लाचेची मागणी केली आहे. त्यांना लाच देण्याची माझी ईच्छा नाही. करीता त्यांच्याविरूध्द कारवाई करीता तक्रार देत आहे. त्यांच्या विरूध्द कार्यवाही करण्यात यावी.



Scanned by TapScanner

मी वरील प्रमाणे माझी लेखी तक्रार दिल्यानंतर पो.निरी. इंगोले, यांनी मला व दोन्ही पंचांना मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी कारवाई करणार असल्याचे कळविले तसेच मला व पंचांना व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड बाबत तसेच पुढे करावयाच्या पडताळणी व सापळा कारवाई बाबत माहीती दिली. त्यानंतर मला व पंच कर्म.क्र. 1 यांना पो.काँ.गि-हे यांची भेट घेवून लाच मागणी बाबत पोलीस चौकी किन्हीराजा येथे रवाना केले. तेथे पोलीस हवालदार नरवाडे साहेबांची भेट झाली. पोलीस चौकी किन्हीराजा येथे गि-हे साहेब हे हजर नव्हते. नरवाडे हवालदार यांनी मला, तुम्हाले काय दयायचं ते ठरल्याप्रमाणे तुम्ही देवून दया असे लाच रकमे संबंधाने म्हटले, तसेच तुमचं काय ठरलेलं हाय असे सांगितले. त्यावर मी नरवाडे साहेबांना, ते तुमाले विचार म्हणत असे म्हटले असता नरवाडे साहेबांनी, आता आम्ही तर पर व्यक्ती दोन हजार रूपये घेतो बॉ...तुम्ही किती देता? असे विचारले. तसेच, तुम्ही काय देता ते सांगा असे म्हटले. त्यावर मी त्यांना, तुम्ही सांगा असे म्हटले. तसेच नरवाडे साहेबांनी, आता तुम्हाले काय दयायचं त्यात कमी जास्त करून दया अन मोकळे व्हा...असे मला म्हणाले. त्यावर मी त्यांना, दया लागतील किती असे विचारले असता नरवाडे यांनी, आमचे विरूध्द चे तक्रारी मध्ये किती लोकांची नावे आहेत बाबत विचारले असता मी, चार असे म्हटले. त्यावर पोलीस हवालदार नरवाडे साहेब यांनी, चार प्रमाणं दया आता असे म्हणून माझे व माझे भाउ, वडिल, आई, असे आमचे चार व्यक्तींचे, प्रत्येक व्यक्तीचे दोन हजार रूपये प्रमाणे एकुण 8000/-रूपये ची लाचेची मागणी केली. तसेच लाच रक्कम पो.काँ.गि-हे साहेब यांचेकडे देण्यास सांगितले. पो.काँ.गि-हे साहेब याचे सोबत माझी भेट न झाल्याने त्यांची पडताळणी करणेकरीता मला व पंच कर्म क्र.1 यांना गि-हे साहेबांचे भेटी करीता पोलीस चौकी किन्हीराजा येथे पुन्हा पाठविले. तेथे माझी गि-हे साहेब यांचे सोबत भेट झाली. मी, पर कन्डीडेट आम्ही दोन घेत असतो असे नरवाडे साहेब यांनी मला सांगितले असल्याचे गि-हे साहेबांना म्हटले असता गि-हे साहेबांनी मला, बर तु किती देत सांग असे म्हटले. त्यावर मी, तुम्हीच सांगा किती दयायचेत... असे सांगितले. तसेच पो.काँ.गि-हे साहेब यांनी, प्रत्येक व्यक्तीचे एक-एक हजार देण्यास सांगितले असता मी त्यांना, एक...एक म्हणजे किती दयायचे चार हजार... असे म्हटले असता पो.काँ.गि-हे साहेब यांनी हु म्हणुन होकार दर्शविला. //2//पो.नि.इंगोले यांनी मला, पोलीस हवालदार नरवाडे व पो.काँ.गि-हे यांनी लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले असून आपल्याला पो.काँ.गि-हे यांचे विरूध्द सापळा आयोजीत करावा लागेल, असे कळविले. अंधार झाल्याने पुढील सापळा कार्यवाहीत अडथळा येईल त्यामुळे माझे विनंती वरून सापळा कार्यवाही दि.08.11.2020 रोजी सकाळी करण्याचे सर्वानुमते ठरले. दि.08.11.2020 रोजी ठरल्याप्रमाणे मी सकाळी 08.30 वा. चे सुमारास किन्हीराजा शिवार मधील कमलेश्वरी देवी मंदिरा जवळ आलो. त्यावेळी तेथे पो.निरी.इंगोले, दोन्ही पंच व स्टाफ हजर होते. लोकसेवक पो.काँ.गि-हे व पोलीस हवालदार नरवाडे साहेब यांना देणे करीता मी आणलेली लाच रक्कम 4000/-रूपये पंचासमक्ष हजर केली. त्यावरून पो.नि.इंगोले साहेबांनी त्या नोटांचे वर्णन व क्रमांक नोंद करून पंचासमक्ष अँन्थ्रासिन पावडर चे गुणधर्मा बाबत व अल्ट्राव्हायलेट लम्प बाबत माहीती देऊन पंच, स्टाफ व मला पुढील कार्यवाही बाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच कर्म क्र.1 यांना पो.काँ.गि-हे साहेब यांचे भेटीकरीता पोलीस चौकी किन्हीराजा येथे पाठवून सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले. परंतु गि-हे साहेब हे पोलीस चौकी किन्हीराजा येथे हजर मिळून आले नाही. त्यानंतर मी, पंच कर्म क्र.1 सह कमलेश्वरी देवी मंदिर येथे परत आलो व तेथून गि-हे साहेब यांना फोन लावला असता गि-हे साहेब यांनी मला तिवारीच्या हॉटेल मध्ये लाच रक्कम 4000/-रूपये देण्याबाबत सांगितले. त्यानंतर पो.नि.इंगोले, दोन्ही पंच व स्टाफ असे त्या ठिकाणी हजर आले. तसेच त्यानंतर गि-हे साहेब यांचा मला फोन आला व त्यांनी लाच रक्कम शुभम तिवारी, शुभम हॉटेल किन्हीराजा यांचेकडे देण्यास सांगितले.वरून शुभम हॉटेल किन्हीराजा येथे सापळा कार्यवाहीचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार मी किन्हीराजा येथे शुभम तिवारी ची भेट घेतली व त्यांचे समोर गि-हे साहेबां सोबत फोनवर बोलनी केली. गि-हे साहेबांनी मला शुभम तिवारी यांचेकडे लाच रक्कम देण्यास सांगितले असता शुभम तिवारी यांनी, बर बर ठिक आहे असे गि-हे साहेबांना सांगितले. मी शुभम तिवारी यांना किती दयायचे असे विचारले असता त्यांनी चार हजार सांगितले. मी शुभम तिवारी यांना, नरवाडे साहेब कुठ राहतात, आमचे प्रकरण आपसात घ्यायाचे होते, असे सांगितले असता शुभम तिवारी यांनी,काही विषय नाही तुम्ही डायरेक्ट सांगुन दया शुभम जवळ भेटतो म्हणा मी कोणाचा फोन आला तर असे मला लाच रकमे संबंधाने सांगितले. दरम्यान मी शुभम तिवारी यांचेकडे माझे फुलपन्टचे डावे खिशातील 4000/-रूपये काढून त्यांचे समोर धरले असता शुभम तिवारी यांनी 4000/-रूपये लाच रक्कम 10.16 वा. सुमारास स्विकारली व त्याचे फुलपन्टचे मागील बाजुच्या डाव्या खिशात ठेवली. वरून मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी शुभम तिवारी यांना पंचासमक्ष लाच रक्कम रु. 4000/- सह रंगेहाथ पकडले. लोकसेवक संतोष जगदेव गि-हे, पो.काँ. व गणेश गणपत नरवाडे, पोलीस हवालदार यांनी तक्रारदार, तक्रारदार यांची आई, वडील व भाउ विरूध्द शिवाजी डाखोरे यांनी पो.स्टे.जउळका येथे दिलेल्या तक्रारी मध्ये पुढे कार्यवाही न करण्याकरीता लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वतःचे आर्थीक फायदया करीता गैरमार्गाने लाचेची मागणी केली. संतोष गि-हे यांनी लाच रक्कम 4000/-रूपये शुभम तिवारी रा.किन्हीराजा यांचेकडे देण्यास सांगितले. तसेच शुभम तिवारी यांनी माझे कडुन लाच रक्कम 4000/-रूपये शुभम हॉटेल, किन्हीराजा येथे स्विकारली आहे. करीता माझी संतोष जगदेव गि-हे, पो.काँ. व गणेश गणपत नरवाडे, पोलीस हवालदार व शुभम तिवारी, रा.किन्हीराजा यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद पो.ना.अरविंद राठोड, ला.प्र.वि.वाशीम यांनी संगणकावर टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहिले माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष

पंच सहया - 1) (ए.पी.इंगोले)

2)पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. वाशिम

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rajesh Atmaram pandit(SI (Sub-Inspector)) / RAPM8901 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned by TapScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Bachse

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Rajesh Atmaram pandit
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): RAPM8901

सुरेश मधुकर बेलोकर



Scanned by TapScanner